
काहीही अशक्य नाही

नेली ब्लाई

मराठी: अश्विनी बर्वे



काहीही अशक्य नाही

नेली ब्लाई

मराठी: अश्विनी बर्वे

१८८५ मध्ये, काही लोकांचा असा विश्वास होता की स्त्रियांनी काम करणे किंवा नोकरी करणे अशक्य आहे. पण नेली ब्लाई म्हणाल्या, "काहीही अशक्य नाही."

त्यावेळी नेली १७ वर्षांची होती आणि तिने वर्तमानपत्रात 'मुली काय करू शकतात' (What Girls Can Do) नावाचा एक लेख वाचला होता. त्या लेखात असा दावा केला होता की, कोणतीही स्त्री घराबाहेर कोणतेही काम व्यवस्थित करू शकत नाही. लेखातील युक्तिवादाने नेली निराश झाली, म्हणून तिने आपल्या भावना व्यक्त करणारे एक पत्र वर्तमानपत्राला लिहिले. तिने इतके चांगले पत्र लिहिले की वर्तमानपत्राने तिला नोकरीवर ठेवले.



त्या वेळेपासून नेलीने वर्तमानपत्रात वार्ताहर म्हणून काम करायला सुरुवात केली. वार्ताहराचे काम म्हणजे आपण पाहिलेल्या घटना आणि लोकांनी सांगितलेल्या गोष्टींबद्दल लिहिणे.


नेलीला तिच्या कामाची प्रचंड आवड होती . ती सर्वत्र प्रवास करायची. तिला नवीन लोकांना भेटायला आणि नवीन गोष्टी पाहायला खूप आवडायचे. तिने जे पाहिले आणि लोकांनी तिला जे सांगितले, त्याबद्दल ती लिहायची. लोकांना तिचे लेख वाचायला खूप आवडायचे.





१८८८ मध्ये, ती न्यूयॉर्क शहरातील '*द वर्ल्ड*' *या वृत्तपत्रात* वार्ताहर म्हणून काम करत होती .

एके दिवशी, नेली वृत्तपत्राचे व्यवस्थापक जॉन कॉक्रिल यांच्याशी बोलली. तिने वाचलेल्या '*अराउंड द वर्ल्ड इन एटी डेज* ' नावाच्या पुस्तकाबद्दल तिने त्यांना सांगितले. त्या कथेत एका माणसाने ऐंशी दिवसांत पृथ्वीची प्रदक्षिणा केली होती. त्या काळात, कोणीही खरोखरच असे करू शकेल, यावर कोणाचाही विश्वास नव्हता. पण नेलीला ते करून बघायचे होते.



१८८८ साली, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करायला खूप वेळ लागायचा. तेव्हा विमाने नव्हती. समुद्र पार करण्यासाठी लोकांना जहाजाने कित्येक आठवडे प्रवास करावा लागत असे.

पूर्वी लोक जमिनीवरून रेल्वेने प्रवास करायचे. पण त्या काळात रेल्वेगाड्या आतासारख्या वेगाने धावत नसत. आता ती धावते. पूर्वी रेल्वेनेही कुठेही पोहोचायला कित्येक दिवस लागायचे.

तेव्हा ऐंशी दिवसांत जगप्रदक्षिणा करणे अशक्य वाटत होते.






सुरुवातीला, श्री. कॉक्रिल यांची इच्छा नव्हती की नेलीने जगप्रदक्षिणा करण्याचा प्रयत्न करावा. ती ते करू शकणार नाही. असे त्यांना वाटत होते.

नेलीने प्रवासाला नेण्यासाठी एक बॅग भरली होती. तिला तिचे सामान एका ट्रेनमधून दुसऱ्या ट्रेनमध्ये टाकण्याची वाट पाहायची नव्हती.

१४ नोव्हेंबर, १८८९ रोजी सकाळी ९ वाजून ४० मिनिटांनी, नेली न्यू जर्सीमध्ये एका जहाजावर चढली. अखेरीस तिच्या जगप्रवासाला सुरुवात झाली होती.






अनेक आठवड्यांच्या समुद्रप्रवासानंतर नेली इंग्लंडला पोहोचली. तिथे तिची भेट इंग्लंडमधील *'द वर्ल्ड' वृत्तपत्रासाठी* काम करणाऱ्या दुसऱ्या एका वार्ताहराशी झाली.

रिपोर्टरने नेलीला विचारले की तिला युरोपमध्ये काय पाहायचे आहे. ती म्हणाली की तिला एका व्यक्तीला भेटायचे आहे. तिला *'अराउंड द वर्ल्ड इन एटी डेज'* हे पुस्तक लिहिणाऱ्या माणसाला भेटायचे होते . ती व्यक्ती म्हणजे ज्युल व्हर्न.






"तुम्हाला ज्युल व्हर्न यांना भेटायचे आहे का?" पत्रकाराने विचारले. "ते शक्य नाही. तुमच्याकडे वेळ नाही!"

“काहीही अशक्य नाही,” असे नेली ब्लाई म्हणाल्या.

ज्युल व्हर्नला भेटायला नेलीला दोन दिवसांचा रेल्वे प्रवास करावा लागला. प्रवासात तिला झोपायला वेळच मिळाला नाही. पण अखेरीस ती फ्रान्समधील त्या ठिकाणी पोहोचली, जिथे ज्युल व्हर्नचे घर होते.






लेखकाला अनेक प्रश्न विचारण्याची आणि त्यांनी *'अराउंड द वर्ल्ड इन एटी डेज' जिथे* लिहिले ते बघण्याची संधी तिला मिळाली.

पण नेलीला लगेच परत जावे लागले.

"शुभेच्छा, नेली," ज्युल व्हर्न म्हणाले. "मला आशा आहे की तू ऐंशी दिवसांपेक्षा कमी वेळात जगप्रदक्षिणा करशील."

नेलीलाही तशीच आशा होती. पण ज्युल व्हर्नला भेटायला तिचे दोन दिवस वाया गेले होते. ती वेळेवर घरी पोहोचू शकेल का?



नेली चांगल्या गतीने प्रवास करत हॉगकॉगला पोहोचली. पण जेव्हा ती तिथे पोहोचली, तेव्हा तिला कोणीतरी सांगितले की एलिझाबेथ बायलँड नावाची दुसरी एक पत्रकारसुद्‌धा जगभर प्रवास करत आहे.

मिस बायलँड नेलीपेक्षा कमी वेळात जगप्रदक्षिणा करण्याचा प्रयत्न करत होत्या. त्या काही दिवसांपूर्वीच हाँगकाँगहून निघाल्या होत्या. तो माणूस म्हणाला की, नेलीसाठी मिस बायलँडच्या आधी परत येणे अशक्य होते.



"काहीही अशक्य नाही," नेली म्हणाली. पण आता तिला पूर्ण खात्री पटली नव्हती. तिचा प्रवास अजून खूप लांब होता. ती मिस बायलँडच्या आधी घरी पोहोचू शकेल का?

नेलीने हार मानली नाही. पॅसिफिक महासागर पार करण्यासाठी ती जहाजावर चढली. अखेरीस, काही आठवड्यांनंतर, ती सॅन फ्रान्सिस्कोमध्ये पोहोचली.


सॅन फ्रान्सिस्कोमध्ये, ती न्यू जर्सीला जाणाऱ्या ट्रेनमध्ये चढली. नेलीला वाटत होते की प्रवास लवकर संपेल. तिला घरी पोहोचण्याची खूप घाई झाली होती.






न्यू जर्सीला जाताना ट्रेन अनेक ठिकाणी थांबली. प्रत्येक स्टेशनवर लोक नेलीला भेटायला येत होते. तिने जगभर प्रवास केल्याचे त्यांनी वाचले होते. त्या सर्वांना तिला यशासाठी शुभेच्छा द्यायच्या होत्या.

एका स्टेशनवर एक माणूस तिला ओरडून म्हणाला, "तू माझ्याशी हस्तांदोलन केलेच पाहिजे!" जेव्हा नेलीने त्याच्याशी हस्तांदोलन केले, तेव्हा तो हसला आणि म्हणाला, "माझ्या हातात सशाचा पाय आहे. तो तुझ्यासाठी शुभ ठरेल!"





कदाचित सशाचा पाय नेलीसाठी भाग्यवान ठरला. तिचा न्यू जर्सीपर्यंतचा प्रवास वेगाने सुरू झाला.

शेवटच्या स्टेशनच्या आधी, मिस्टर कॉक्रिल ट्रेनमध्ये चढले. त्यांनी नेलीला सांगितले की मिस बायलँड अजून परत आल्या नव्हत्या. नेली त्यांच्या आधीच पोहोचली होती. मग त्यांनी नेलीला पुढच्या स्टेशनवर ट्रेनमधून उतरायला सांगितले, जिथून तिने प्रवासाची सुरुवात केली होती.



ट्रेन शेवटच्या स्टेशनवर पोहोचताच नेलीने बाहेर पाहिले. तिला स्टेशनवर अनेक लोक तिची वाट पाहत उभे असलेले दिसले.

नेली आनंदाने हसली आणि तिने ट्रेनमधून खाली उडी मारली. ती प्लॅटफॉर्मवर उभी असताना, मिस्टर कॉक्रिल यांनी वेळ पाहण्यासाठी आपल्या घड्याळाकडे पाहिले. २५ जानेवारी, १८९० , दुपारचे ३:३१ वाजले होते. नेलीने ७२ दिवसांपेक्षा थोड्या अधिक काळात यशस्वीपणे जगप्रदक्षिणा पूर्ण केली होती.

"मी हे करून दाखवलं!" नेली ओरडली. "काहीही अशक्य नाही." नाही. पण घरी परत आल्याचा मला खूप आनंद झाला आहे.



नेलीने तिच्या प्रवासाचे वृत्तांत लिहिले. तिने इतरही अनेक कथा लिहिल्या. तिच्या कथा वाचताना, लोकांना जणू काही आपण नवीन ठिकाणी प्रवास करत आहोत आणि नवीन दृश्ये पाहत आहोत असे वाटायचे. नेलीने त्यांना जगाची एक झलक दाखवली आणि वेळोवेळी हे सिद्‌ध केले की काहीही अशक्य नाही.



